# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 12 June 2025
# Time 7.10 AM to 7.20 AM
# Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १२ जून २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- अत्याधुनिक पायाभूत सुविधा निर्मितीत भारताने घेतलेली झेप ही शाश्वतता आणि दूरदृष्टी या वैशिष्ट्यांनी प्रेरित असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- कच्च्या खाद्य तेलावरील आयात शुल्कात १० टक्क्यांपर्यंत कपात करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांना 'कर्नल कमांडंट' ही मानद पदवी प्रदान
- लग्न जुळवून देण्याच्या नावाखाली आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीला बीड जिल्ह्यात अटक

आणि

- वादळी वाऱ्यामुळे झालेल्या दुर्घटनेत छत्रपती संभाजीनगर इथं दोन महिलांचा मृत्यू

****

अत्याधुनिक पायाभूत सुविधा निर्मितीत भारताने घेतलेली झेप ही शाश्वतता आणि दूरदृष्टी या वैशिष्ट्यांनी प्रेरित असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पायाभूत सुविधांमधल्या क्रांतीची अकरा वर्षे असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरच्या आपल्या संदेशात नमूद केलं आहे.

कल्याणकारी विकासासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं पंतप्रधानांनी म्हटलं आहे. कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांच्या समाजमाध्यमावरच्या संदेशावर बोलतांना मोदी यांनी, विविध कल्याणकारी योजना जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचतील, याची खात्रीही दिली.

**

गेल्या ११ वर्षात सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्वांच्या माध्यमातून देशातल्या नागरिकांच्या जीवनमानात आमुलाग्र परिवर्तन घडून आलं आहे. यासंदर्भात विविध मान्यवरांनी घेतलेला हा आढावा...

*''पायाभूत सुविधांमध्ये केंद्र सरकारने केलेल्या क्रांतीमुळे भारताचं नवनिर्माण झाल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात शहा यांनी, या सुविधांमुळे व्यापार आणि आर्थिक व्यवहार पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक वेगवान झाल्याकडे लक्ष वेधलं.*

****

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत जगातली चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनल्याचा अभिमान वाटतो, अशी भावना केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केली आहे. ते काल नाशिक इथं बोलत होते. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या विमानतळाचा विकास करण्यात येणार असल्याची घोषणा मोहोळ यांनी केली.*

****

*केंद्र सरकारने मागील अकरा वर्षात विकसित भारताचे भविष्य डोळ्यासमोर ठेवून नागरिकांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विकासाला गती देण्याचे काम केलं, असं तुळजापूरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी म्हटलं आहे. ते काल धाराशिव इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. गेल्या ११ वर्षांत धाराशिव जिल्ह्यात झालेल्या विकास कामांचा आढावा घेत, सध्या सुरू असलेल्या अनेक योजनांची पाटील यांनी माहिती दिली.*

****

*छत्रपती संभाजीनगर इथले उद्योजक विवेक देशपांडे यांनी गेल्या ११ वर्षांत दळवळणाच्या पायाभूत सुविधांमध्ये झालेल्या विकासाचा या शब्दात आढावा घेतला...''*

**बाईट – विवेक देशपांडे**

****

रेल्वेचं तत्काळ तिकीट आरक्षित करण्यासाठी प्रवाशांना यापुढे आधार संलग्न ओटीपी नोंदवणं बंधनकारक असणार आहे. जुलै महिन्यापासून याची अंमलबजावणी होणार आहे. तत्काळ तिकीटांचं आरक्षण सुरू झाल्यावर पहिल्या अर्धया तासात रेल्वे एजंटांना तिकीट आरक्षित करता येणार नाही, असा निर्णयही रेल्वे मंत्रालयानं जाहीर केला आहे.

****

कच्च्या खाद्यतेलावरील आयात शुल्क २० टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. यानुसार सूर्यफूल, सोयाबीन आणि पाम तेलासह कच्चं तेल आणि रिफाइंड तेलावरील आयात शुल्कात कपात झाली आहे. शुल्कातल्या कपातीचा लाभ ग्राहकांपर्यंत पोहोचवावा, अशा सूचना केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने खाद्यतेल उत्पादक कंपन्यांना दिल्या आहेत.

दरम्यान, यूपीआय व्यवहारांवर मर्चंट डिस्काउंट रेट–एमडीआर लावण्याबाबचं वृत्त निराधार असल्याचं, केंद्रीय अर्थ मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

****

भारत सरकार इटालियन कंपन्यांसाठी "होम अवे फ्रॉम होम" या संकल्पनेवर आधारित समर्पित औद्योगिक वसाहती विकसित करणार आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी इटली दौऱ्यादरम्यान ही माहिती दिली. राज्यात या वसाहतींसाठी मुंबईजवळील दिघी आणि छत्रपती संभाजीनगर इथल्या ऑरिक सिटीची निवड करण्यात आली आहे.

****

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विजय फुलारी यांना काल 'कर्नल कमांडंट' या मानद पदवीने सन्मानित करण्यात आलं. राष्ट्रीय छात्र सेना–एनसीसीचे छत्रपती संभाजीनगरचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर ए.जी.बारबरे यांनी डॉ. फुलारी यांना 'कर्नल कमांडंट' ही पदवी आणि बॅटन, तसंच महासंचालक लेप्टनंट जनरल गुरबिरपाल सिंग यांचं या संदर्भातलं पत्र सन्मानपूर्वक प्रदान केलं. कुलगुरु फुलारी यांनी एनसीसीसाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा हा सन्मान करण्यात आला आहे. कुलगुरु फुलारी यांनी या सन्मानाला उत्तर देतांना, हा विद्यापीठाचा बहुमान असून, हा सन्मान आपण विद्यापीठाला समर्पित करत असल्याची भावना व्यक्त केली.

****

येत्या २१ जून रोजी ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय योग संस्थानचे छत्रपती संभाजीनगर इथले गटप्रमुख सुरेश शेळके यांनी दिलेली वृक्षासनाबाबतची माहिती आज आपण जाणून घेऊया..

**बाईट – सुरेश शेळके**

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या रहिवासी मंजू चौधरी यांचं स्वत:चं घर बांधण्याचं स्वप्न पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून पूर्ण झालं आहे. याबाबतच्या आपल्या भावना त्यांनी आकाशवाणीशी बोलतांना व्यक्त केल्या..

**बाईट – मंजू चौधरी**

****

लग्न जुळवून देण्याच्या नावाखाली आर्थिक फसवणूक करणाऱ्या सात जणांच्या टोळीला बीड जिल्ह्यात अटक करण्यात आली. आष्टी तालुक्यातल्या कारखेल बुद्रुक तसंच वडवणी इथं प्रत्येकी एका तरुणाची या टोळीने फसवणूक करून सुमारे नऊ लाख रुपये लुबाडले होते. या प्रकरणी तपासादरम्यान टोळी पोलिसांच्या हाती लागल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं काल सायंकाळी वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळल्या, वादळी वाऱ्यामुळे महानगरपालिकेच्या सिद्धार्थ उद्यानाची कमान ढासळून दोन महिलांचा मृत्यू झाला. शहरात अनेक ठिकाणी झाडे मोडून पडली. अशाच एका घटनेत रस्त्यावरून जाणारी युवती अंगावर फांदी पडल्याने जखमी झाली. बीड तसंच जालना जिल्ह्यातही जोरदार वाऱ्यासह पावसाचं वृत्त आहे.

****

नांदेड जिल्ह्यात वादळी वारे आणि पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करण्याच्या सूचना नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दिल्या आहेत. यासंदर्भात शासनस्तरावर निर्णय घेऊन नुकसानग्रस्तांना त्वरीत मदत केली जाईल, असं सावे यांनी सांगितलं.

****

मराठवाड्यातल्या बहुतांश भागात येत्या चौदा तारखेपर्यंत वादळी वारे आणि मेघगर्जनेसह हलका पाऊस होण्याची शक्यता आहे. पुढचे ३ दिवस उत्तर महाराष्ट्र आणि मुंबई महानगर क्षेत्र वगळता संपूर्ण राज्यात यलो अलर्ट देण्यात आला आहे.

राज्यात पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असं आवाहन राज्याच्या कृषी विभागाने केलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यातील अंगणवाड्यांना सक्षम अंगणवाडी म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी ही माहिती दिली. सध्या जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यातून पाच अशा एकूण ८० अंगणवाड्यांतून हा पथदर्शी प्रकल्प राबवण्यात येणार आहे.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं काल छत्रपती संभाजीनगर इथं शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. सरकारने शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेसंदर्भात विधान परिषदेले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषद घेत, सरकारवर टीका केली. या प्रकरणी मराठवाड्यातील सत्ताधारी आमदार तसंच मंत्र्यांना निवेदन दिल्याचं दानवे यांनी सांगितलं.

****

पौगंडावस्थेतल्या मुलींचं मासिक पाळीबाबत समुपदेशन करण्यासाठी लातूर महापालिकेच्या वतीने विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. महापालिकेच्या एकूण १६ आरोग्य केंद्रांमार्फत दरमहा १० आणि ११ तारखेला हा उपक्रम राबवण्यात येईल. काल या उपक्रमांतर्गत ५४४ मुलींना मार्गदर्शन करण्यात आलं.

****

हुजूर साहिब नांदेड ते पंजाबच्या फिरोजपूर कॅन्ट जंक्शनपर्यंत नवीन साप्ताहिक रेल्वे सुरु करण्यात आली आहे. ही रेल्वे येत्या १५ जूनपासून दर रविवारी सकाळी नांदेडहून तर फिरोजपूरहून दर शुक्रवारी दुपारी सुटणार आहे.

****